विधानमंडळ कामकाज :
अत्यंत तातडीचे :

विधानसभा/विधान परिषद प्रश्नासंदर्भात प्राथमिक माहिती विहित मुदतीत पाठविणेबाबत....

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
परिपत्रक क्रमांक : एलईजी-१०९३/१५१४/पांच,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १६ सप्टेंबर, १९९३.

पहा:- १] विधानकार्य विभाग, परिपत्रक क्र. एलईजी-१०८६/पांच, दिनांक १३ जानेवारी, १९८६.
२] विधान कार्य विभाग, परिपत्रक क्र. एलईजी-१०८६/३/पांच, दिनांक १८ जुलै, १९८६.
३] सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. शाकाप-१०८७/२१/१८ [र.व का.] दिनांक ५ मे, १९८७.
४] संसदीय कार्य विभाग, क्र. एलईजी-१०९०/प्र.क्र. २८/पांच, दिनांक ९ जुलै, १९९०.
५] संसदीय कार्य विभाग क्र. एलईजी-१०९१/१२०/प्र.क्र. ९/पांच, दिनांक २ फेब्रुवारी, १९९१.
६] संसदीय कार्य विभाग, परिपत्रक क्र. एलईजी-१०९२/२४२३/पांच, दिनांक १६ नोव्हेंबर, १९९२.

शासन परिपत्रक :-

ज्यावेळी विधानमंडळ सदस्यांतर्फे प्रश्न महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविला जातो त्यावेळी त्या सचिवालयाकडून सदर प्रश्न [अ] राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार आहे काय? [ब] प्रश्न वस्तुस्थितीवर आधारलेला आहे काय, [क] प्रश्नाधीन बाबी संदर्भात राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार आहे काय, [ड] प्रश्नासंदर्भात वस्तुस्थिती काय आहे वगैरे विशिष्ट मुद्यावर मंत्रालयीन विभागाकडून माहिती मागविली जाते. ही प्राथमिक माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून प्रश्न विभागाकडे प्राप्त झाल्यापासून ४ दिवसांत पाठविण्यास पाहिजे. या माहितीच्या आधारे प्रस्तुत प्रश्न स्वीकृत करावा किंवा नाही यादृष्टीने निर्णय घेणे मा. अध्यक्ष, सभापती यांना सोयीचे होते. या संदर्भात स्पष्ट अशा सूचना यापूर्वीही वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने असे निदर्शनास आणले आहे की,

....२/-

प्रश्नासंदर्भात मागविलेली प्राथमिक माहिती मंत्रालयीन विभागाकडून विहित मुदतीत न येता पंधरा ते वीस दिवसांनी येते त्यामुळे काही वेळेस तो प्रश्न स्वीकृत होऊन संबंधीत विभागास परत पाठविण्यास उशीर होतो. याचा परिणाम संबंधीत विभागास उत्तर तयार करण्यास फारच थोडा अवधी मिळतो. ही माहिती वेळेवर पाठविली नाही तर विधानमंडळ सचिवालयात प्रश्न स्वीकारण्याबाबत व त्यावर निर्णय घेण्यास अडचणी येतात.

३. यास्तव सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, यापुढे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने प्रश्नाबाबत मागविलेली प्राथमिक माहिती त्या सचिवालयाने विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच प्रश्न प्राप्त झाल्यापासून ४ [चार] दिवसांचे आत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही

[ दे. ना. चौधरी ]

प्रधान सचिव,

संसदीय कार्य विभाग.

प्रत :-

सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
मंत्रालयीन विभागाचे इतर सर्व सचिव,
सचिव, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती.

सोरते/४२०९३....

ADM
15-10-93